**प्रेसनोट** **तारीख १६/०३/२०१९**

## शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे शहर

## तडीपार करण्यात आलेल्या आरोपीस अटक

दि.१५/०३/२०१९ रोजी के.पी.पाटील पोलीस उप निरीक्षक व पोलीस कर्मचारी पो.शि.सागर रासकर,पो.शि दिपक कांबळे,पो.शि जगदीश ठाकरे असे शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे शहर हे पोलीस ठाणे हद्दीमध्ये नाकाबंदी डयुटी करीत असताना पो.शि सागर रासकर यांना गुप्त बातमीदरामार्फत बातमी मिळाली की,शिवाजीनगर पोलीस ठाणेकडील पोलीस रेकॉर्डवरील तडीपार करणेत आलेला आरोपी नामे अशोक ऊर्फ बॉबी विजय काकडे हा त्याचे रहाते घरी आला असल्याबाबत खात्रीशीर बातमी मिळाल्याने लागलीच सदर मिळाले बातमीचे अनुषंगाने कारवाई करणेकामी के.पी.पाटील पोलीस उप निरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे शहर व पो.शि दिपक कांबळे,पो.शि जगदीश ठाकरे असे पो.शि.सागर रासकर यांना मिळाले बातमीचे ठिकाणी तडीपार आरोपी यांचे रहाते घरी ११८७/६८ मॉडर्न बिल्डींग घोले रोड,शिवाजीनगर पुणे येथे जाऊन खात्री करता तो त्यांचे रहाते घरी मिळून आला. त्यांस मा.पोलीस उप आयुक्त सो,परि-१ पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक -०९/२०१९ दि.१२/०२/२०१९ अन्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पुणे ग्रामीण जिल्हयाचे हद्दीतून ०१ वर्षाकरिता तडीपार करण्यात आले असल्याबाबत माहिती मिळाल्याने त्यांने पुणे शहरामध्ये येण्याकरिता शासनाची अगर मा.पोलीस उप आयुक्त सो,परि-१ पुणे शहर यांची परवानगी घेतलेली आहे अगर कसे याबाबत त्यांस विचारणा केली असता त्याने कोणतीही परवानगी घेतलेली नसल्याचे सांगितल्याने त्यांस ताब्यांत घेऊन त्यांचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर :- १८९/२०१९ म.पो.का.कलम १४२,३७ (१)(३)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे,श्री बापू शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक के.पी.पाटील ,पो.शि दिपक कांबळे ,पो.शि ठाकरे,पो.शि शिरकांडे व पो.शि रासकर यांनी केलेली आहे.

( बाळासाहेब कोपनर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे शहर